# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 30 ) 1st Octomber 2005 ( No : 07

# मा. सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करणारा निर्णय घेण्यात विद्यापीठ अनुदान आयोगाचा थेट सहभाग

## असा सहभाग नमूद असलेले तीन महत्वपूर्ण पूरावे

**प्रा.बी.टी.देशमुख,** *विधानपरिषद सदस्य*

१. महाराष्ट्रातील सर्व पारंपारिक विद्यापीठासाठी एकच कायदा असून त्या कायद्याचे नाव "महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४" असे आहे. महाविद्यालयामध्ये शिक्षक म्हणून सेवेत रुजू होण्यासाठी उमेदवाराची पात्रता कुणी ठरवावयाची ही गोष्ट या कायद्याने तपशीलवारपणे ठरवून दिलेली आहे.

२. याबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने आपली भूमिका पुढील शब्दात मांडलेली आहे. :-

"2. LAWFUL INSTRUMENT FOR PRESCRIBING QUALIFICATIONS :

2.1 The Non-Agricultural Universities in Maharashtra, viz, University of Mumbai, SNDT Women's University, University of Pune, Nagpur University, Amravati University, Shivaji University, North Maharashtra University, Dr. Babasaheb Marathwada University and Ramanand Tirth University are governed by the provisions of the Maharashtra Universities Act, 1994. Section 51(8) of the said Act provides that Recruitment and Qualifications of the teachers of the Universities and the affiliated colleges is **to be regulated by Statutes** to be made by the Universities. In case Statutes do not exist or where Statutes exist but they need to be amended, and if in the opinion of the Universities it is likely to take time before new Statutes could be brought into existence or existing Statutes could be amended, Section 14(8) of the Act provides the Vice Chancellors with powers to issue **directions.**

2.2 Section 8(3) of the said Act empowers the State Government to issue **Standard Cod**e for the purpose of securing and maintaining uniform standards by Notification in the official Gazette.

2.3 It may be pointed out that the UGC is fully aware of such provisions in the Universities Act in different States in the country and therefore in all the Regulations/Notifications that the UGC has been issuing from time to time, the UGC has been emphasizing that it would be necessary for the Universities to make Statutes to implement the UGC Notifications/Regulations."

३. १९९९ पर्यंतच्या काळात नेटसेटची पात्रता परीक्षा कायद्याने महाराष्ट्रात लागूच करण्यात आली नव्हती ही गोष्ट महासंघाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून दिली होती ती पुढील शब्दात. :-

"3.5 Thus, it is clear that instead of firmly introducing NET/SET as compulsory entry point qualification condition for recruitment of candidates through the competent legal instruments such as the **Standard Code,** the State Government took resort to informal instruments paying lip sympathy to the UGC directions.

3.6 In Maharashtra, NET/SET qualification, though stated from time to time by the Government, **was never brought into existence as entry point qualification condition by the lawful machinery,** viz,. the Statutes or Directions by the Vice Chancellor of the Universities or the Standard Code by the State Government."

**"१९९१ साली राज्य सरकारने आदेश देऊनही विद्यापीठाने आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नव्हते. आता १९९९ मध्ये राज्य सरकारने आदेश दिल्यानंतर सर्व विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले आहेत. यु.जी.सी. असे म्हणते की नेट-सेट १९९१ पासून अनिवार्य आहे. सुप्रीम कोर्टाचे जजमेंट वेगळे म्हणते."**

**- मा. उच्च शिक्षण मंत्री**

*(परिच्छेद १७ पहा)*

४. नेटसेटची पात्रता परीक्षा विधिवतरित्या लागू करणारा 'कायदा' सन १९९९ च्या डिसेंबर महिन्यात महाराष्ट्रात लागू झाला ही गोष्ट सुद्धा महासंघाने पुढील शब्दात लक्षात आणून दिली होती. :-

"5.2 With reference to old qualification, new qualification and the **cut off date,** it is necessary to point out that old arrangement for recruitment in the teaching cadre consists of -

(i) qualifications prescribed by clause 8 in the GR dated 27th February 1989 (page 17 of the booklet) which had become Statute and which reads as "Generally the minimum qualifications for appointment to the post of Lecturer in the scale of pay of Rs. 2200-4000 shall be a master's degree in the relevant subject with at least 55% of marks, or its equivalent grade and good academic record"; and

(ii) selection committees prescribed in clause 9 of the same Statute which reads as "the Selection Committee has already been laid down in the Appendix accompanying Government Resolution, Education and Youth Services Department No. USG.1177/129387/XXXII (Cell), dated 25th October 1977". This also was converted into Statute in all the Universities in the State.

This arrangement was continued to be in operation till it was replaced by the new arrangement which came into existence by issuance of directions by the Vice Chancellors. For instance, in Amravati University it was done by Direction No. 7 of 1999 dated 30th December 1999 and in other Universities in the State also around the same date. These prescribed the new qualifications making the NET/SET compulsory at the recruitment level and composition of selection committees for recruitment in the teaching cadre. These directions in some of the Universities have been converted into Statutes and in some others they are in the process of being done. Thus it is crystal clear that the lawful cut off date for demarking old arrangement and new arrangement is 30th December 1999 or a few days prior to that or a few days thereafter. According to the Hon'ble Supreme Court of India decision, NET/SET would not be applicable to them."

५. सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेटसेट बाबतच्या १९९१ च्या रेग्युलेशनचे तपशीलवार विश्लेषण करणारा निवाडा दिनांक ८.९.१९९४ रोजी दिला असून हे रेग्युलेशन शिफारसींच्या स्वरुपाचे (The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character.) आहे. ते सक्तीचे करावयाचे किंवा नाही याबाबतचा निर्णय विद्यापीठाने वा शासनाने घ्यावयाचा आहे. तसा निर्णय घेण्यात आल्यास तो परिनियम किंवा प्रमाणसंहिता निर्गमित केल्यानंतरच्या काळात (The second proviso to clause 2 makes the application of the said Regulations prospective.) लागू पडेल, पूर्वलक्षी प्रभावाने नव्हे. हे रेग्युलेशन उमेदवारासाठी (Relates to all applicants i.e. candidates) लागू आहेत, असे त्या निर्णयामध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे.

६. विद्यापीठ अनुदान आयोगाचे अधिकारी व पदाधिकारी सतत बदलत रहातात एक अध्यक्ष जावून दुसरे अध्यक्ष आले की जुने लक्षात रहात नाही. त्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची सुद्धा आठवण रहात नाही. ३ जून १९९२ च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष श्री. जी.राम रेड्डी यांनी महाराष्ट्राच्या शिक्षणमंत्र्यांना पत्र लिहून नेटसेट पात्रता सक्तीची करण्यासाठी विद्यापीठाचे परिनियम बदलण्याची विनंती केली होती. त्यानंतरही अनेक वर्षे अशी विनंती विद्यापीठ अनुदान आयोगाकडून केली जात होती. पण पुढे ही पात्रता परीक्षा पूर्वलक्षी प्रभावाने लादता येणार नाही असा सर्वोच्च न्यायालयाचा ठामपणाचा निर्णय झालेला असतांना देखील विद्यापीठ अनुदान आयोगाने ती पात्रता पूर्वलक्षी प्रभावाने लादण्याच्या दृष्टीने आपले धोरण बदलले.

७. "**विद्यापीठ अनुदान आयोगाने "नेटसेट असल्याशिवाय वरिष्ठ किंवा निवडश्रेणी दिली जाणार नाही**" अशी भूमिका घेतली होती. २४ डिसेंबर १९९८ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेच्या परिच्छेद ८.४. मध्ये ही भूमिका नमूद आहे. "**सेवेत भरती झाल्यावर, प्लेसमेंटच्या वेळी अशी नेटसेटची अट पूर्वलक्षी प्रभावाने लादल्यामुळे, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होतो.**" ही गोष्ट संघटनांनी लक्षात आणून दिल्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाने आपली भूमिका बदलली व नेटसेट बाबतच्या आपल्या पूर्वीच्या सर्व अधिसूचना रद्द केल्या व ४ एप्रिल २००० चे रेग्युलेशन समाविष्ट असलेली अधिसूचना निर्गमित केली.

८. 'कट ऑफ डेट' नंतर सेवेत आलेल्या काही प्रकरणांच्या बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाला नेटसेट मुक्ती देता येते काय? हे तपासून पाहून निर्णय घेण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाला दिले. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने २००१ च्या याचिका क्रमांक ५०२२ मध्ये दिनांक २० फेब्रुवारी २००२ रोजी दिलेल्या निकालात स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की :-

"We also hold that the cases of candidates appointed from 12th October, 1999 till 18th October, 2000 are required to be examined so as to ascertain the applicability of the first proviso to clause 2 of the 1991 Regulations as well as 2000 Regulations before their services are sought to be terminated by the respective universities and/ or colleges/ institutions." याचा अर्थ "१२ ऑक्टोबर १९९९ ते १८ ऑक्टोबर २००० या काळातील प्रकरणांची छाननी करावी" असा हा निर्णय आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयाने २००१ च्या याचिका क्रमांक ५७८२मध्ये दिनांक १४ एप्रिल २००२ रोजी दिलेल्या निकालात स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की :-

"7. In the event the UGC takes decision adverse to the interests of teachers the management and the University are directed not to act upon it for a period of four weeks from the date of communication by UGC to the college through the University. In the result the petitions mentioned in the schedule to this order are disposed of by this order..... Except those petitions mentioned to be heard separately, rest of the petitions mentioned in the schedule are covered by this order and are accordingly disposed."

या निर्णयात शेवटी परिशिष्ट देण्यात आले असून त्या परिशिष्टात दिलेल्या १०४ प्रकरणांची छाननी करुन विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्णय घ्यावा असे नमूद असतांना त्या निकालाचे निमित्त करुन विद्यापीठ अनुदान आयोगाने सन १९९१ ते १९९९ या काळातील सर्व प्रकरणांची छाननी हाती घ्यावी ही गोष्ट एका बाजूला सर्वोच्च व दुसऱ्या बाजूला उच्च न्यायालयाचा सरळसरळ अवमान करणारी आहे.

९. "चार महिन्यात निर्णय घेण्याचा स्पष्ट आदेश मा. उच्च न्यायालयाने दिलेला असतांना चार वर्षे होत आली तरी विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्णय कां घेतला नाही? याचा नुसता खुलासा करुन चालणार नाही तर त्याबद्दल

**"सभापती महोदय, ही बाब खरी आहे की, १९९१ साली यु.जी.सी.ने रेग्युलेशन्स राज्य सरकारला पाठविले होते. त्यानंतर राज्यसरकारने हे रेग्युलेशन्स विद्यापीठांना पाठवत असतांना ते असाधारण राजपत्रात प्रसिध्द करुन पाठवावयास पाहिजे होते. तसे करण्यात आले असते तर ते लिगल इन्स्ट्रुमेन्ट ठरले असते. परंतु राज्य सरकारकडून त्यावेळी ही चूक झालेली आहे." - मा. उच्च शिक्षण मंत्री**

*(परिच्छेद १५ पहा)*

# शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर २००५
## रोजी दुपारी ४.०० वाजता
### सर्व विद्यापीठांच्या मुख्यालयावर
# विद्यापीठस्तरीय मोर्चाचे आयोजन
### 'वस्तुस्थिती' विद्यापीठ अनुदान आयोगाला कळविण्यात यावी अशी मा. कुलगुरुंना विनंती करण्यात येईल.

विद्यापीठ अनुदान आयोगाने मा. उच्च न्यायालयाची क्षमा मागितली पाहिजे.'' ही महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची मागणी अत्यंत न्यायोचित आहे असेच कोणीही म्हणेल. 'कट ऑफ डेट' नंतरच्या प्रकरणाचा ४ महिन्यात निर्णय देण्याची बाब बाजूला ठेवून विद्यापीठ अनुदान आयोगाने 'कट ऑफ डेट' पूर्वीची म्हणजे १९९१ ते १९९९ या काळातील प्रकरणे आपल्याकडे छाननीसाठी मागवून घेण्याचा सपाटा लावला. असे करण्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होतो, यांची नक्की माहिती असल्यामुळे आपल्या कोणत्याही पत्रव्यवहारामध्ये आयोगाने तारखेचा उल्लेख केलेला नाही ही गोष्ट खरी आहे. पण त्यामुळे या अपकृत्यातील विद्यापीठ अनुदान आयोगाचा सहभाग आयोगाला लपवून ठेवता आला नाही. अशी लपवा छपवी करण्यामध्ये आयोगाला संपूर्णपणे अपयश आलेले आहे.

१०. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान करुन १९९१ ते १९९९ या काळातील प्रकरणे छाननीसाठी घेण्याला विद्यापीठ अनुदान आयोगाचीच थेट चिथावणी कारणीभूत आहे हे सिद्ध करणारे ३ मजबूत पुरावे या संदर्भात उपलब्ध झालेले असून ते पुढील प्रमाणे आहेत. :-

(१) मंगळवार, दिनांक ११ डिसेंबर २००१ रोजी महाराष्ट्र विधान परिषदेत महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण मंत्र्यांनी तारांकित प्रश्न क्रमांक १९५२१ ला दिलेले उत्तर **(सहपत्र एक)** व त्यापूर्वी दिनांक ३ ऑगस्ट २००१ रोजी लक्षवेधी सूचनेवर सभागृहात झालेली चर्चा.

(२) २६ ऑक्टोबर २००४ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहसचिवांनी मुंबई येथे घेतलेल्या बैठकीचे कार्यवृत्त. **(सहपत्र दोन)**

(३) महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षण संचालकांनी निर्गमित केलेले २८ ऑक्टोबर २००४ चे आदेश. **(सहपत्र तीन)**

ही तीनही कागदपत्रे **सहपत्र एक ते तीन** म्हणून सोबत दिलेली आहेत. व या तीनही पुराव्याची तपशीलवार छाननी पुढील परिच्छेदातून केलेली आहे.

११. **"नेटसेट परीक्षेच्या स्वरुपाविषयी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला अंतिम निर्वाळा"** या विषयावर मंगळवार, दिनांक ११ डिसेंबर २००१ रोजी मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी तारांकित प्रश्न क्रमांक १९५२१ ला दिलेले उत्तर महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाहीच्या अधिकृत प्रतिवेदन खंड १२६ मध्ये क्रमांक ७ च्या पृष्ठ क्रमांक ३९ वर नोंदबद्ध झालेले असून ते जसेच्या तसे शब्दशः **सहपत्र एक** म्हणून सोबत दिलेले आहे. "नेटसेटची परीक्षा उमेदवारांसाठी सक्तीची करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या रेग्युलेशनबाबत एका प्रकरणात (सिव्हील अपील नं.१८१९/१९९४ ए.आय.आर. सुप्रिम कोर्ट ३३६) सर्वोच्च न्यायालयाने या रेग्युलेशनची तपशीलवार चिकित्सा करणारा अंतिम निर्णय दिला व विद्यापीठ अनुदान आयोगाचे हे रेग्युलेशन शिफारशीच्या (रेक्मेंडटरी) स्वरुपाचे असून त्या शिफारसी राज्य शासनाने किंवा विद्यापीठाने सक्तीच्या केल्यास पुढील काळात सेवेत येणाऱ्या अर्जदारांना लागू राहतील (प्रॉस्पेक्टीव्ह) असा स्पष्ट निवाडा सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेला आहे, हे खरे आहे काय" या प्रश्न भाग १ ला मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी एका शब्दात 'होय.' असे उत्तर दिलेले आहे. त्यातील एखाद्या वाक्यांशाला सुद्धा 'नाही' असे उत्तर दिलेले नाही. संपूर्ण प्रश्न भाग १ ला 'होय.' असे उत्तर दिलेले आहे. मात्र 'होय.' नंतर पूर्ण विराम दिल्यावर लगोलगच पुढील वाक्य त्या उत्तरात पुढीलप्रमाणे नमूद आहे. **"विद्यापीठ अनुदान आयोगाने केलेल्या खुलास्या अनुसार हे विनियम दिनांक १९ सप्टेंबर १९९१ पासून लागू असून हे**

***सहपत्र : एक***

## नेटसेट परीक्षेच्या स्वरुपाविषयी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला अंतिम निर्वाळा

*तिसरे अधिवेशन २००१ : मंगळवार, दिनांक ११ डिसेंबर २००१ : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*

*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२६, क्रमांक ७, पृष्ठ ३९*

(४८) *** १९५२१ सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, सुरेश पाटील, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, विलास अवचट, रविंद्र मिर्लेकर, अरविंद सावंत, श्रीमती उमेशा पवार, सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब सांळुखे, अशोक मोडक, श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री विजय गिरकर, सुभाष देशमुख, प्रकाश जावडेकर** : दि.३ ऑगस्ट, २००१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक १६ जुलै २००१ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक १६०६२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय–

(१) नेटसेटची परीक्षा उमेदवारांसाठी सक्तीची करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या रेग्युलेशनबाबत एका प्रकरणात (सिव्हील अपील नं.१८१९/१९९४ ए.आय.आर. सुप्रिम कोर्ट ३३६) सर्वोच्च न्यायालयाने या रेग्युलेशनची तपशीलवार चिकित्सा करणारा अंतिम निर्णय दिला व विद्यापीठ अनुदान आयोगाचे हे रेग्युलेशन शिफारशीच्या (रेक्मेंडटरी) स्वरुपाचे असून त्या शिफारसी राज्य शासनाने किंवा विद्यापीठाने सक्तीच्या केल्यास पुढील काळात सेवेत येणाऱ्या अर्जदारांना लागू राहतील (प्रॉस्पेक्टीव्ह) असा स्पष्ट निवाडा सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेला आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, नेटसेटची परीक्षा सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी सक्तीची करणे, त्यांना बढतीच्या संधी नाकारणे, या विसंगती दूर करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचा उक्त निर्णय लक्षात घेता व युजीसीचे ४ एप्रिल २००० चे रेग्युलेशन विचारात घेता शासनाने काय उपाययोजना केलेली आहे;

(३) अद्याप उपाययोजना केलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१) **होय.** विद्यापीठ अनुदान आयोगाने केलेल्या खुलास्या अनुसार हे विनियम दिनांक १९ सप्टेंबर १९९१ पासून लागू असून हे अनिवार्य स्वरुपाचे असल्याने सर्व विद्यापीठांना त्यांचे पालन करणे बंधनकारक आहे.

(२) व (३) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून दिनांक ४ एप्रिल २००० रोजी निर्गमित केलेले विनियम विचारात घेता शासनाने **दिनांक १९-९-१९९१ ते ११-१२-१९९९ या कालावधीत विहित निवड समितीच्या माध्यमातून नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा काही अटीवर खंडीत न करण्याबाबतचा निर्णय दिनांक १८-१०-२००१ च्या आदेशान्वये निर्गमित केला आहे.**

**अनिवार्य स्वरुपाचे असल्याने सर्व विद्यापीठांना त्यांचे पालन करणे बंधनकारक आहे.**"

१२. तारांकित प्रश्न क्रमांक १९५२१ च्या प्रश्न भाग १ ला दिलेले "होय" हे उत्तर मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी शासनाचे मत म्हणून स्वतः दिलेले उत्तर आहे. तर त्यापुढच्या वाक्यात त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाचे मत नमूद केलेले आहे. उच्च शिक्षण मंत्री मा. श्री. दिलीप वळसे पाटील यांना धन्यवाद दिले पाहिजेत ते याबद्दल की त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा बारकाईने अभ्यास करुन ठामपणे "होय." असे उत्तर दिले होते. नुसते शाब्दिक उत्तर देवून ते थांबले नाहीत तर त्याप्रमाणे काहीशी समाधान कारक कृतीही त्यांनी पार पाडलेली होती. सर्वोच्च न्यायालयाकडून पराभव झाल्यामुळेच विद्यापीठ अनुदान आयोगाला "**निवडसमितीमार्फत विधिवतरित्या निवड झालेल्या व तत्कालीन किमान पात्रता धारण करणाऱ्या शिक्षकांना नेटसेट पात्रता लागू असणार नाही**" अशी तरतूद असलेली ४ एप्रिल २००० ची अधिसूचना काढावी लागली होती ही बाबसुद्धा त्यांनी काळजीपूर्वक लक्षात घेतली होती. त्याप्रमाणे त्यांनी मेहनतपूर्वक प्रस्ताव तयार केला. तो मंत्रिमंडळासमोर मांडला व मंजूर करुन घेतला. या प्रश्नाचे थोडेसे समाधान

***सहपत्र : दोन***

## GOVERNMENT OF MAHARASHTRA

**NoUSG-2003/(50/2003)/UNI-4, : Dated the 2nd November, 2004**

**Higher and Technical Education Deptt., : Mantralaya Annexe, Mumbai 400 032**

To,

1) Shri A.K.Dogra, Joint Secretary, University Grants Commission, Bahadur Shah Zafar Marg, New Delhi:110002

2) The Registrars of all the Universities.

3) The Director, Higher Education,Maharashtra State, Pune.

4) All the Joint Directors of Higher Education.

**Subject:-** Minutes of the meeting held on 26th Oct. 2004 at Mumbai regarding relaxation in NET/SET.

Sir,

Please find herewith the minutes of the meeting held on 26th October 2004 at Mumbai University, Mumbai regarding relaxation in NET/SET examination to the lecturers appointed in the Colleges/Universitis in the Maharashtra State for necessary action.

Thanking you,

Yours faithfully,

**(S.N. Chitre ),**

Dy. Secretary to Government

## MINUTES

**of the meeting regarding relaxation from the NET/SET Examination from the University Grants Commission held on 26th October 2004 at 11.00 a.m. in the Management Council Hall of Mumbai University, Mumbai.**

All the Universities in the State have submitted their proposals in the prescribed format for seeking relaxation/exemption from the Net/Set Examination to the University Grants Commission.

However, the information given by the Universities in the prescribed format was not proper, therefore, U.G.C. has requested this Department to hold the meeting with the Registrars of the Universities and the Joint Directors of Higher Education. Accordingly, this meeting was held on 26th October, 2004, the following officers from the U.G.C were present.

1. Shri Ashok Kumar Dogra. - Joint Secretary, University Grants Commission.
2. Ms. Shashi Munjal - Under Secretary, University Grants Commission
3. Ms. Rita Goyal - Under Secretary University Grants Commission

The list of the other members who were present in the meeting is enclosed herewith.

**At the beginning of the meeting all the members have introduced themselves. First of all Shri Dogra has clarified that Lecturers who have submitted thesis for Ph.D. before 31st December 2002 or who have awarded degree of Ph.D. upto that date are exempted from the Net/Set Examination and the lecturers who were appointed after 19th September 1991, are required to pass Net/Set Examination There is an Exemption Committee in the University Grants Commission who decides all the cases of the Net/Set Examination. Therefore, it is decided by the U.G.C that all the Universities should submit the cases of relaxation with the full details in the format prescribed by the U.G.C ,** to the Deputy Secretary (University Education) Higher and Technical Education Department, Mantralaya and Deputy Secretary will accordingly hold the University-wise meetings with the Exemption Committee of the University Grants Commission.

It is decided in the meeting that the last date of the submission of the relaxation cases to the Government will be 27th November 2004. The Jt. Directors should submit the information of the Government Colleges through the respective Universities

The Joint Directors as well as Registrars have raised their, doubts before the Joint Secretary regarding rules, guidelines of the University Grants Commission and got their doubts clarified. One of the points raised was that whether Net/Set is necessary for the Law Subject. The Joint Secretary has clarified that there is no relaxation for the law subject. The Director of Higher Education has pointed out that particularly in the Maharashtra State no Professor is having the required qualifications for the Principal post prescribed by the U.G.C and therefore, most of the Principal's posts are vacant. Joint Secretary said that there are two different scales for the Principals according to their qualification and therefore as per their qualifications Principals can be appointed in the respective scales. However their is no relaxation for having Ph. D qualification as essential qualification to the post of Principal .

Regarding reservation Policy, Joint Secretary clarified that reservation is the State subject and the policy can be decided by the State Government.

Most of the members of the Committee requested the Joint Secretary that the marks of the candidates who appeared for the Net/Set Examination, must be conveyed by the U.G.C. Pune University Because if the marks obtained in the NET/SET Examination are conveyed, the non-qualified candidates will be aware of the poorness in the subject and can improve in the next examination. **Joint Secretary said that for this demand Teachers Association should approach the University Grants Commission. Government or University should not make any efforts to that effect.**

The meeting was ended with the vote of thanks to the Chair.

करणारा शासननिर्णय पुरेशा समाधानकारकपणे घेतलेल्या मेहनतीनंतर त्यांनी निर्गमित केला होता व ही बाब उपरोक्त तारांकित प्रश्नाच्या भाग २ व ३ च्या एकत्र उत्तरात त्यांनी पुढील शब्दात नमूद केली होती. :- "(२) व (३) **विद्यापीठ अनुदान आयोगाकडून दिनांक ४ एप्रिल २००० रोजी निर्गमित केलेले विनियम विचारात घेता** शासनाने दिनांक १९-९-१९९१ ते ११-१२-१९९९ या कालावधीत विहित निवड समितीच्या माध्यमातून नियुक्त झालेल्या **अधिव्याख्यात्यांच्या सेवा काही अटीवर खंडीत न करण्याबाबतचा निर्णय दिनांक १८-१०-२००१ च्या आदेशान्वये निर्गमित केला आहे.**" या तारांकित प्रश्नाला शासनातर्फे देण्यात आलेली उत्तरे काळजीपूर्वक अभ्यासली असता सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय 'रेग्युलेशन रेकमेंडेटरी'चा असतांना विद्यापीठ अनुदान आयोग मात्र १९९१ पासून ते मँडेटरी असल्याचा पोरकट आग्रह धरुन होते, असे स्पष्टपणे दिसून येते. शासनाने मात्र विद्यापीठ अनुदान आयोगाचा सल्ला बाजूला ठेवून या शिक्षकांच्या सेवा नियमित करणारा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी सुसंगत शासन निर्णय निर्गमित केला होता. त्यात काही 'दुर्देवी खुंट्या' मारुन ठेवल्या होत्या हा वेगळा भाग.

१३. मंगळवार, दिनांक ११ डिसेंबर २००१ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक १९५२१ ला मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी दिलेले उत्तर, किंवा त्यापूर्वी १८ ऑक्टोबर २००१ ला त्यांनी निर्गमित केलेला शासननिर्णय ह्या एकाएकी किंवा अकस्मात घडलेल्या घटना नव्हत्या. या प्रश्नावर गेल्या अनेक अधिवेशनांत सभागृहात चर्चा होत होती. विशेषतः लगत पूर्वीच्या अधिवेशनात शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ रोजी खूपच खडाजंगीची तपशीलवार चर्चा झाली. शिक्षकांची बाजू कायदेशीर आहे, १० हजार शिक्षकांचा हा प्रश्न आहे. सहानुभूतीपूर्वक विचार करू, १५ दिवसांत याबाबत निर्णय करु (तसा निर्णय त्यांनी केला सुद्धा) अशी भूमिका घेत असतांनाच विद्यापीठ अनुदान आयोगाचा 'नंगेपणा' सभागृहातील चर्चेत अत्यंत सभ्यपणे मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सादर केला व विद्यापीठ अनुदान आयोगाला सभागृहात 'नागवे' केले ही गोष्ट या चर्चेची अधिकृत प्रतिवेदने आजही वाचली तरी स्पष्टपणे दिसून येते.

१४. ३ ऑगस्ट २००१ रोजी लक्षवेधी सूचनेवरील अनुपूरक चर्चेत सन १९९१ च्या ज्या रेग्युलेशनच्या आधारावर विद्यापीठ अनुदान आयोग मिशावर ताव मारीत आहे, ते " **दि. १९ ,सप्टेंबर १९९१ चे रेग्युलेशन होते ते युजीसीने रद्द केले, ही गोष्ट खरी आहे काय?**" असा पहिलाच उपप्रश्न श्री. वसंतराव काळे यांनी विचारला त्याला मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी ठामपणे '**होय**' असे एका शब्दाचे उत्तर दिले. मात्र रद्द केलेले हे नोटीफिकेशन मँडेटरी आहे असे विद्यापीठ अनुदान आयोगाने शासनाला कळविले आहे व त्यावर आम्ही लिगल ओपिनियन मागविले आहे हे सांगायला ते विसरले नाहीत. त्यांचे शब्द जसेच्या तसे :-

"**श्री.दिलीप वळसे-पाटील** : सभापती महोदय, मी आपल्याला सुरुवातीलाच सांगितले की, या संदर्भातील अनेक लिगल पॉईन्टस् उपस्थित होतात. **युनिव्हर्सिटी ग्रॅन्ट कमिशनकडून जो खुलासा आलेला आहे, त्यामध्ये हे मॅन्डेटरी आहे, असे म्हटलेले आहे.** तरीसुध्दा यामध्ये अधिक माहिती घेण्यासाठी या संदर्भाने लिगल ओपिनियन मागविलेले आहे. म्हणून मला असे सांगावयाचे आहे की, या संदर्भातील जो काही निर्णय असेल तो निर्णय पॉझिटिव्हदृष्ट्या १५ दिवसामध्ये घेतला जाईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५, पृष्ठ १३७)* याला विद्यापीठ अनुदान आयोगाचा 'नंगेपणा' म्हणा किंवा अत्यंत सभ्य भाषेत उच्च शिक्षण मंत्र्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला सभागृहात 'नंगे' केले म्हणा. "नेटसेट पूर्वलक्षी प्रभावाने अमलात आणल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा भंग होतो म्हणून १९९१ ची अधिसूचना रद्द केली व २००० ची बाहेर काढली. नेटसेट मागच्यांना लागू नाही असे दुसरे परंतूक २००० च्या अधिसूचनेमध्ये आहे. या वस्तुस्थितीकडे डोळे उघडून पहाण्याचे ठरविले तरच आयोगाची अब्रू वाचू शकेल" यापेक्षा वेगळ्या शब्दात याबाबतचा विचार मांडता येत नाही.

१५. कायद्याने नेटसेट पात्रता परीक्षा १९९९ पर्यंत परिनियम करुन महाराष्ट्रात लागू करण्यात आलेली नव्हती, राज्य शासनाला स्टँडर्ड कोड करता येते पण ते गॅझेटमध्ये प्रकाशित करावे लागते असे विद्यापीठ कायद्यातच बंधन आहे. तेही राज्य शासनाने केलेले नव्हते. "**लिगल इन्स्ट्रुमेन्टने १९९९ पर्यंत नेटसेट कधीच प्रिस्क्राईब केलेली नाही. स्टॅन्डर्ड कोड इश्यू केलेले नाही. डायरेक्शन्स इश्यू झालेल्या नाहीत. परिनियम झालेले नाहीत. हा काय शिक्षकांचा दोष आहे काय? विद्यापीठाने परिनियम सक्तिचे केलेले नाहीत. तुम्ही म्हणजे राज्य शासनाने स्टॅन्डर्ड कोड केलेले नाही, याबद्दल कोणी काही बोलत नाहीत. स्टॅन्डर्ड कोड तुम्ही का काढले नाही?" अशी सभागृहात विचारणा केली असता ही राज्य शासनाची चूक झालेली आहे** ही गोष्ट मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी प्रांजळपणे कबूल केली ती पुढील शब्दात :-

"**श्री. दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, ही बाब खरी आहे की, १९९१ साली यु.जी.सी.ने रेग्युलेशन्स राज्य सरकारला पाठविले होते. त्यानंतर **राज्यसरकारने हे रेग्युलेशन्स विद्यापीठांना पाठवत असतांना ते असाधारण राजपत्रात प्रसिध्द करुन पाठवावयास पाहिजे होते. तसे करण्यात आले असते तर ते लिगल इन्स्ट्रुमेन्ट ठरले असते. परंतु राज्य सरकारकडून त्या वेळी ही चूक झालेली आहे.** १९९१ मध्ये जी.आर.काढून राज्य सरकारने विद्यापीठांना हे आदेश पाठविले होते. राज्य सरकारचा हा जी.आर.जरी असला तरी लिगल इन्स्ट्रुमेन्ट नसल्यामुळे विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नसतील. त्यामुळे कदाचित मधल्या काळात या नियुक्त्या होत राहिल्या आहेत." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५, पृष्ठ १४१)*

*सहपत्र : २ दोनचे सहपत्र*

**नेट/सेट परीक्षा शिथील करणे /सूट देण्याबाबत आज दिनांक २६.१०.२००४ रोजी सकाळी ११.०० वाजता मॅनेजमेंट कौन्सिल रुम, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे आयोजित बैठकीस उपस्थित अधिकारी व कर्मचारी**

अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव व हुद्दा, पत्ता, स्वाक्षरी

१.अशोककुमार डोगरा, सहसचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली
२.श्रीमती शशी मुंजाल,अवर सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली
३.श्रीमती रिटा गोयल,अवर सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली
४.श्री. ल.रा. माने, प्रभारी कुलसचिव,मुंबई विद्यापीठ, मुंबई
5. Dr. A.A. Paradkar, University of Bombay
6. L.F. Vasame, University of Bombay
7. S.T. Belsare, Registrar,Nagpur University
8. Dr. P.S. Narkhede, Registrar,Amravati University
9. V.V.Bhosale , Asstt.Registrar Shivaji University, Kolhapur
10. Dr. Mrs. P.B. Somwanshi, Deputy Registrar
11. Kishor C. Bhide, Registrar, S.N.D.T. Womens University
12. Dr. P.B. Kumbhar , Registrar, Solapur University, Solapur
13. V.S. Jadhao, Administrative officer, Office of Jt. D.E. Kolhapur Region
14. Dr. R.B. KanhereJoint , Director (H.E.) Aurangabad Division
15. Dr. G.D. RathodJt, Director (H.E.), Nagpur Division
16. Mrs. A.S. VinchurkarJr, Director (H.E.), Pune Region
१७. अ.मा. भट्टलवार, उपसचिव उ व तंशि विभाग
१८. सौ. सी.न. चित्रे, उपसचिव, उ व तं.शि विभाग
१९. डॉ. एस.एन. पठान, संचालक, उच्च शिक्षण
२०. डी.के.अंभोरे, सहसंचालक, अमरावती
21. L.D. Kokate, Administrative Officer, JDHE, Jalgaon
22. D.S. Pathele, Superidendent, Nagpur University
23. S.M. Hambarde, A.R., S.R.T.U., Nanded
24. Dr. N.M. Kulkarni, Dy. Registrar, K.K. Sanskrit Univ., Ramtek
25. M.P. Bhosale, Admin. Suptt., Shivaji University, Kolhapur
26. C.E. Atravalkar, Asstt. Supdtt., Dr. B.A.M.U., Aurangabad
27. Shri Kishor Bhide, Registrar, SNDT Women s University, Mumbai
28. Shri. Narendra Varavadekar, O.S., SNDT University, Mumbai
29. Kiran P. Mane, Jt. Director of Education (HE), Kolhapur Region
30. Dr. Rajkishor Gupta, Registrar, North Maharashtra University, Jalgaon
31. R.S. Munawwar Ali, Joint Director, Higher Education, Nanded Region, Nanded
32. B.B. Patil, A.R. North Maharashtra University, Jalgaon
33. M.E. Lohikare, Admin. Officer, D.H.E., Pune
34. A.D. Gawande, Jt.A.O., Joint D.E., Aurangabad
35. M.V. Mundra, P.A. to JDHE, Pune Region, Pune
36. P.N. Yadav, Deputy Registrar, University of Mumbai
37. F.S. Meshram, S.O., H & T. E.D., Mantralaya, Mumbai

***"विद्यापीठ अनुदान आयोगाचे अधिकारी श्री डोग्रा साहेब यांनी उपरोक्त विषयाबाबत सर्व प्रचलित नियमानुसार सविस्तर व सुस्पष्ट मार्गदर्शन केले. दिनांक १९.९.९१ नंतर अधिव्याख्याता म्हणुन सेवेत रुजु झालेल्या व नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या सर्व अधिव्याख्यात्यांच्या व्यक्तीगत प्रकरणिका नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याकरिता विहीत नमुण्यात तयार करावयाच्या आहेत "***

*(परिच्छेद ३१ पहा)* *शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांच्या दिनांक २८-१०-२००४ रोजीच्या आदेशातून*

१६. **महाराष्ट्रामध्ये "कट ऑफ डेट" कोणती आहे? याबाबतचा स्पष्ट उल्लेख मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी या चर्चेत केल्याचे दिसून येते. कोणत्याही परिस्थितीत ही तारीख ११.१२.१९९९ पूर्वीची असू शकत नाही ही गोष्ट त्यांच्या उत्तरावरून स्पष्ट होते.** "आपण म्हणजे महाराष्ट्र सरकार विद्यापीठांना त्या परिनियमात सुधारणा करण्याचे आदेश १५ दिवसांत देणार आहे किंवा नाही?" असा प्रश्न जेंव्हा त्यांना विचारण्यात आला तेव्हा त्यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले. :-

"**श्री.दिलीप वळसे पाटील** : यासंदर्भातील आदेश राज्य सरकारने सर्व विद्यापीठांना दिनांक ११.१२.१९९९ रोजी दिलेला आहे **आणि त्याची अंमलबजावणी ११.१२.१९९९ नंतर सगळ्या विद्यापीठांनी केलेली आहे."** *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५, पृष्ठ १४०)* याबाबतची माहिती घेण्याचे कष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतले तर त्यांना प्रत्येक विद्यापीठातील "कट ऑफ डेट" मिळू शकेल. सर्व ठिकाणी ती ११.१२.१९९९ नंतरचीच आहे हेही त्यांच्या लक्षात येईल.

१७. **सन १९९१ चे रेग्युलेशन मँडेटरी आहे असे विद्यापीठ अनुदान आयोगाने आम्हाला सांगितले आहे, असे सभागृहात सांगून मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी आयोगाच्या अंगावरील धोतर अगोदरच ओढून घेतले होते. सुप्रिम कोर्टाचे जज्जमेंट वेगळेच आहे आयोग वेगळेच सांगत आहे, असे सांगून त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाची लंगोटीसुद्धा भर सभागृहात खेचून घेतली व आयोगाला सभागृहात 'नागवे' केले.** अर्थात हे अत्यंत सुसंस्कृत, सभ्य व सांसदिय भाषेत. त्यांचे ते उद्गार शब्दशः पुढील प्रमाणे :-

"१९९१ साली राज्य सरकारने आदेश देऊनही विद्यापीठाने आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नव्हते. आता १९९९ मध्ये राज्य सरकारने आदेश दिल्यानंतर सर्व विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले आहेत. यु.जी.सी. असे म्हणते की नेट-सेट १९९१ पासून अनिवार्य आहे. सुप्रीम कोर्टाचे जजमेंट वेगळे म्हणते." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५, पृष्ठ १४१)*

१८. राज्य सरकार या नात्याने आम्ही १९९१ पासून तर १९९९ पर्यंत विद्यापीठ अनुदान आयोगाचेच 'तुणतुणे' वाजवित आहोत, अशा अर्थाचे उद्‌गार सभागृहात काढून आयोगासारख्या शिर्षस्थ संस्थांनी किती जबाबदारपणे वागले पाहिजे याचा इशाराच सभ्य भाषेत मा. उच्च शिक्षणमंत्री देत होते. अशा शिक्षकांची संख्या १० हजार आहे, एवढेच सांगून ते थांबले नाहीत तर आम्ही सहानुभुतीने निर्णय घेऊ. १५ दिवसात निर्णय घेऊ, असेही त्यांनी सभागृहात सांगितले ते पुढील शब्दात :-

"राज्य सरकारने वारंवार यु.जी.सी.च्या आधाराने आणि बाकीच्या गोष्टीच्या आधाराने सभागृहामध्ये तसेच सभागृहाच्या बाहेरही परीक्षा अनिवार्य आहे, अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे या राज्यामध्ये १९९१ सालापासून ते १९९९ सालापर्यंतच्या मधल्या काळात जे शिक्षक निरनिराळ्या विद्यापीठात नोकरीस लागलेले आहेत, ज्यांनी नेट-सेटची अर्हता धारण केलेली नाही अशा १० हजार शिक्षकांच्या भवितव्याचा हा प्रश्न आहे आणि या राज्यातील या दहा हजार शिक्षकांच्या भवितव्याचा प्रश्न सहानुभूतीने सोडविण्याच्या दृष्टीने राज्य सरकार निश्चितपणे विचार करीत आहे. मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की या संदर्भातील निर्णय राज्य सरकार १५ दिवसामध्ये घेईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५, पृष्ठ १४१)*

१९. कालच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर हा प्रश्न होता, पण निर्णय झाला नाही, १० हजार शिक्षकांचा हा प्रश्न आहे. आम्ही सहानुभुतीने

***सहपत्र : तीन***

## महाराष्ट्र शासन

**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) : महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१**

Web : www.dirhe.org Email : dirhe@pn2.vsnl.net.in 020/26122119, 26057572, 26130627, 26124639 Fax. No. 020/26111153

***क्रं. /उशिसं/एनजीसी/२००४/३२११८/नेटसेट/मवि-१ : दिनांक २८-१०-२००४***

प्रति,

१. कुलसचिव, सर्व विद्यापीठे

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य

**विषय** :- नेट/सेट परीक्षा शिथील करणे/सुट देणेबाबत.

**संदर्भ** :- शासनाचे क्रमांक युएसजी/२००३/(५०)/विशि-४, दिनांक १५ ऑक्टोबर २००४ चे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत उपरोक्त संदर्भीय पत्रात नमूद केल्यानुसार दिनांक २६/१०/२००४ रोजी सकाळी ११.०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृह, मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे सर्व विद्यापीठांचे कुलसचिव व सर्व विभागीय सहसंचालक यांची समन्वय सभा झाली **या सभेत विद्यापीठ अनुदान आयोगाचे अधिकारी श्री. डोग्रा साहेब यांनी उपरोक्त विषयाबाबत सर्व प्रचलीत नियमानुसार सविस्तर व सुस्पष्ट मार्गदर्शन केले.**

**दिनांक १९/९/९१ नंतर अधिव्याख्याता म्हणुन सेवेत रुजु झालेल्या व नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या सर्व अधिव्याख्यात्यांच्या व्यक्तीगत प्रकरणीका नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याकरिता विहीत नमुण्यात तयार करावयाच्या आहेत त्याबाबतचा विहीत नमुना सदर सभेत सर्व संबंधीतांना वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच, हे काम प्रत्येक विद्यापीठाने एक महिन्याच्या आत म्हणजे दि. २७/११/२००४ पूर्वी पूर्ण करावयाचे आहे उपरोक्त विषयाबाबतचे ही शेवटची संधी आहे.**

आपल्या विद्यापीठा अंतर्गत माहिती तयार झाल्यानंतर उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या मार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांना कळवावयाचे आहे. त्यानंतर कामाचा कार्यभार पासून विद्यापीठ अनुदान आयोगाची समिती विद्यापीठ निहाय अधिव्याख्यात्यांचे व्यक्तीगत प्रकरणिका पाहून उपरोक्त विषयाबाबत निर्णय देण्यासंबंधी बैठकांचे आयोजन करतील.

आपल्या विद्यापीठांतर्गत जी शासकीय महाविद्यालय आहेत, त्यांची विषय निहाय स्वतंत्र प्रकरणिका आपल्या मार्फतच समिती पुढे सादर करावयाच्या आहेत. या बाबतीत प्राचार्य शासकीय महाविद्यालये यांना आदेशीत करत आहोत. तरी, याबाबत आपण पूर्ण सहकार्य करावे.

**शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)**

महाराष्ट्र राज्य, पुणे-१

विचार करू, १५ दिवसात निर्णय घेवू, असे मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सभागृहाला सांगितले. नेटसेट नसलेले हे प्राध्यापक तदर्थ शिक्षक (Adhoc) आहेत असे काही सहसंचालकांना, संचालकांना, कुलसचिवांना व कुलगुरुंना वाटत होते. त्यातील काहींना आजही तसे वाटते. अशा दिवाभितांच्या डोळ्यात उच्च शिक्षणमंत्र्यांनी झणझणीत अंजन घातले. हे तदर्थ शिक्षक आहेत अशी आम्ही (शासनाने) भूमिका (सभागृहात व सभागृहाबाहेर) घेतली पण कायदा व नियम पहाता आमची भूमिका 'बोगस' आहे, या अर्थाची माहिती मा. उच्च शिक्षणंत्र्यांनी सुसंस्कृत शब्दात व सांसदिय भाषेत सभागृहाला दिली. ती शब्दशः पुढील शब्दात :-

"आता प्रश्न असा आहे की, राज्यामध्ये १० हजार शिक्षक या कॅटॅगरी अंतर्गत आहेत, जे नेटसेटची परीक्षा पास झालेले नाहीत किंवा ती पात्रता त्यांनी धारण केलेली नाही, असे हे शिक्षक आहेत आणि आज ते सेवेमध्ये आहेत. **शासनाने वारंवार सभागृहामध्ये आणि सभागृहाबाहेरही ही भूमिका घेतली की, हे तदर्थ शिक्षक आहेत. पण जर विद्यापीठ कायद्यातील स्टॅट्युट आपण पाहिले तर त्याच्या अंतर्गत जो शिक्षक दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी काम करील तो तदर्थ ठरत नाही अशी विद्यापीठाच्या कायद्यात वेगळी तरतूद आहे.** अशा प्रकारचे सर्व लिगल कॉम्प्लीकेशन्स असणारे हे मॅटर आहे. या विषयाच्या बाबतीत आम्ही सातत्याने निर्णय घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. कालही मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर हा विषय होता. पण त्याबाबतीत निर्णय झाला नाही. मागच्या वेळेला मार्च महिन्यामध्ये अधिवेशनाच्या वेळी मी उत्तर दिले होते, असे आश्वासन दिले होते की, याबाबतीत आम्ही साधारणपणे दोन महिन्यामध्ये निर्णय घेऊ. पण दोन महिन्यामध्ये तो निर्णय होऊ शकला नाही. यासाठी जरुर विलंब लागलेला आहे. **पण सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील सर्व शिक्षकांना सांगू इच्छितो की, यासंदर्भातील जो काही निर्णय आहे तो आम्ही १५ दिवसामध्ये घेऊ.**"

२०. लक्षवेधी सूचनेवरील या चर्चेच्या वेळी मा. उच्च शिक्षण मंत्री पूर्ण तयारीनिशी सभागृहात आले होते. न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करण्यासाठी मला थोडा वेळ द्या, असे उद्‌गार मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी अनेक वेळा सभागृहात काढले, हा त्यांच्या विनयाचा भाग होता. कालच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यांनी तो विषय मांडला होता पण त्यावर निर्णय होवू शकला नव्हता ही त्यांची खरी अडचण होती व त्यासाठी त्यांना पंधरा दिवसाचा वेळ पाहिजे होता. आपल्या प्रतिपाद्य विषयाची मजबूत तयारी करुन सभागृहात येणाऱ्या मोजक्या मंत्र्यामध्ये मा. श्री. दिलीप वळसे पाटील यांचा समावेश होतो. शिवाय ते स्वतः कायदेशास्त्रातील 'एलएलएम' या पदव्युत्तर पदवीने उच्च विद्याविभूषित आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा बारीकसारीक तपशील पचवूनच ते सभागृहात आले होते. असे या चर्चेची अधिकृत प्रतिवेदने वाचणाऱ्याला आजही स्पष्टपणे दिसून येते.

"We now turn to analyse the said Regulations. They are made applicable to a University established or incorporated by or under a Central Act, a Provincial Act or a State Act, every institution, including a constituent or an affiliated college recognised by the UGC in consultation with the University concerned, and every institution deemed to be a University." हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील भाग त्यांनी सभागृहात वाचून दाखविला. त्याशिवाय "The provisions of clause 2 of the Regulations are, therefore, recommendatory in character. " आणि " The second proviso to clause 2 make the application of the said Regulations prospective." ही या निर्णयातील महत्त्वाची वाक्ये त्यांनी सभागृहात उद्‌धृत केलीत.

२१, मा. सर्वोच्च न्यायालयाने याच प्रकरणात दिलेल्या निर्णयातील २४ वा परिच्छेद पुढील प्रमाणे आहे. :-

" **24.** It is now appropriate to clarify the direction that the Delhi High Court issued in allowing the writ petition. It held that the notification dated 19th September, 1991, by which the said Regulations were published, was valid and mandatory and the Delhi University was obliged under law to comply therewith. The Delhi University was directed to select lecturers for itself and its affiliated and subordinate colleges strictly in accordance with the notification. Put shortly, the Delhi University is mandated to comply with the said Regulations. As analysed above, therefore, the Delhi University may appoint as a lecturer in itself and its affiliated colleges one who has cleared the test prescribed by the said Regulations; or it may seek prior approval for the relaxation of this requirement in a specific case; or it may appoint as lecturer one who does not meet this requirement without having first obtained the UGC s approval, in which event it would, if it failed to show cause for its failure to

*सहपत्र : चार*

## महाराष्ट्र शासन

*तात्काळ*

**क्रमांक युएसजी २००३/(५०)/विशि-४ : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
***मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२***
***दिनांक २८ ऑक्टोबर, २००४***

**प्रति,**

१) कुलसचिव, सर्व विद्यापीठे,
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य

**विषय** :- नेट/सेट परीक्षा शिथील करणे / सूट देणेबाबत, मुंबई विद्यापीठ येथे दिनांक २६-१०-२००४ रोजी झालेली बैठक

महोदय,

विद्यापीठांनी त्यांच्या अंतर्गत असलेल्या महाविद्यालयांतील / विद्यापीठांतील अधिव्याख्यात्यांना नेट / सेट परीक्षेतून सूट देण्याची प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाला सादर केली आहेत. तथापि या प्रकरणामध्ये सादर केलेली माहिती परिपूर्ण नसल्यामुळे ही माहिती पाठविण्यासंबंधात दिनांक २६-१०-२००४ रोजी मुंबई विद्यापीठात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिकाऱ्याबरोबर बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये विद्यापीठाच्या कुलसचिवांनी, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) / सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे निराकरण, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहसचिवांनी केले.

२. या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सर्व विद्यापीठांनी त्यांच्या अंतर्गत असलेली नेट / सेट परीक्षेतून सूट देण्याची प्रकरणे शासनास दिनांक २७-११-२००४ पर्यंत सादर करावयाची आहेत. तसेच शासकीय महाविद्यालयांची प्रकरणे संबंधित सहसंचालकांनी विद्यापीठामार्फत शासनास सादर करावयाची आहेत. शासनाकडे ही प्रकरणे प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या Exemption Committee बरोबर विद्यापीठ निहाय बैठका आयोजित केल्या जाणार आहेत. तरी विनंती करण्यात येते की, **सर्व विद्यापीठांनी व सहसंचालकांनी नेट / सेट परीक्षेतून सूट देण्याची सर्व प्रकरणे दिनांक २७-११-२००४ पर्यंत शासनास सादर करावीत. ही माहिती सादर करतांना कोणतेही प्रकरण शिल्लक राहणार नाही याची दक्षता घ्यावी.** दिनांक २७-११-२००४ नंतर आलेली कोणतीही माहिती ग्राह्य धरली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

आपली विश्वासू
**(सी.न. चित्रे)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

***"शासनाने वारंवार सभागृहामध्ये आणि सभागृहाबाहेरही ही भूमिका घेतली की, हे तदर्थ शिक्षक आहेत. पण जर विद्यापीठ कायद्यातील स्टॅट्युट आपण पाहिले तर त्याच्या अंतर्गत जो शिक्षक दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी काम करील तो तदर्थ ठरत नाही अशी विद्यापीठाच्या कायद्यात वेगळी तरतूद आहे."***

***- मा. उच्च शिक्षण मंत्री***

(परिच्छेद १९ पहा)

***सन १९९१ चे रेग्युलेशन मॅंडेटरी आहे असे विद्यापीठ अनुदान आयोगाने आम्हाला सांगितले आहे, असे सभागृहात सांगून मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी आयोगाच्या अंगावरील धोतर अगोदरच ओढून घेतले होते. सुप्रिम कोर्टाचे जज्जमेंट वेगळेच आहे आयोग वेगळेच सांगत आहे, असे सांगून त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाची लंगोटीसुद्धा भर सभागृहात खेचून घेतली व आयोगाला सभागृहात 'नागवे' केले.*** *(परिच्छेद १७ पहा)*

abide by the said Regulations to the satisfaction of the U.G.C. forfeit its grant from the U.G.C. If, however, it did show cause to the satisfaction of the U.G.C., it not only would not forfeit its grant but the appointment made without obtaining the U.G.C.'s prior approval would stand regularised." सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील उपरोक्त परिच्छेद २४ मधील बराच मोठा भाग मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात वाचून दाखविला व त्याचा मराठीमध्ये सभागृहाला बिनचूकपणे अर्थ सांगितला तो पुढील शब्दात :-

"सभापती महोदय, याचा अर्थ असा आहे की, सुप्रिम कोर्टाने जजमेंट दिलेले आहे. यु.जी.सी.ने नेट-सेटची पात्रता लागू केलेली आहे ती लागू करीत असताना हा ऑप्शन दिलेला आहे. १९९१ मध्ये वेगळा ऑप्शन दिला होता आणि आता वेगळा ऑप्शन दिला आहे. **आमचे अनुदान हवे असेल तर हे लागू करा. नको असेल तर लागू करण्याची आवश्यकता नाही असे स्वातंत्र्य युनिव्हर्सिटीला दिले आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५, पृष्ठ १३८)*

सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यानुसार नेटसेट पात्रता परीक्षा लागू करण्या न करण्याचे अधिकार शिक्षकांना किंवा शिक्षक संघटनांना दिलेले नाहीत. ते ज्यांना दिलेले आहेत त्यांनी ते वापरावेत, लागू केल्यास कोणत्या तारखेपासून लागू केलेले आहे, हे पारदर्शकपणे जाहीर करावे व पूर्वलक्षी प्रभावाने ते लागू करता येत नाही, असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे हे लक्षात ठेवावे, एवढेच शिक्षकांचे म्हणणे आहे.

२२. या देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने या १० हजार शिक्षकांना अनुकूल असा निर्णय दिलेला आहे. आपण त्या खात्याचे प्रमुख आहात पण अजून निर्णय होत नाही याची टोचणी मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या मनाला लागून राहीलेली होती. १० हजार शिक्षकांचे हित, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय, त्यातील कायदेशीर मुद्दे, ते तपासण्याची संधी, १५ दिवसाची मुदत, नुसता निर्णय करण्याचे नव्हे तर पॉझिटीव्ह निर्णय करण्याचे आश्वासन देतांना मनापासून त्यांनी सभागृहात वापरलेले शब्द पुढील प्रमाणे :-

"या राज्यातील १०.००० शिक्षकांचे हित लक्षात घेऊन सुप्रिम कोर्टाचे जज्जमेंट आहे त्यामधील लिगल पॉईन्ट तपासून घेण्याची संधी मिळाली पाहिजे. या संदर्भात ही तपासणी येत्या १५ दिवसांमध्ये करुन आवश्यक तो पॉझिटीव्ह निर्णय शासन करील." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५, पृष्ठ १३९)*

गेले अनेक महिने सभागृहात अनेक सदस्यांनी या विषयावर उभ्या केलेल्या संघर्षाला तोंड देत असलेल्या मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी मंत्रिमंडळात संघर्ष करुन या कामी यश मिळविले होते व पॉझीटीव्ह निर्णय केला होता. या सर्व शिक्षकांच्या सेवा नियमित करणारा शासननिर्णय त्यांनी २८.१०.२००१ रोजी निर्गमित केला.

२३. 'कट ऑफ डेट' पूर्वी भरती झालेल्या शिक्षकांच्या सेवा नियमित करण्याच्या शासननिर्णयामध्येच 'कट ऑफ डेट' नंतर भरती झालेल्या शिक्षकांना सेवामुक्त करण्याची योजना टाकण्यात आल्याने व्यथित झालेल्या अनेक शिक्षकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. 'कट ऑफ डेट' नंतरच्या अशा शिक्षकांना रिलॅक्सेशन देण्याच्या प्रश्नाचा आयोगाने चार महिन्यात विचार करावा असे आदेश देऊन मा. उच्च न्यायालयाने ही प्रकरणे आयोगाकडे पाठविण्याचा निर्णय दिला. **चार महिन्यात देण्याचा निर्णय चार वर्षे होत आली तरी आयोगाने दिलेला नाही ही एक गोष्ट व 'कट ऑफ डेट' नंतरच्या काही प्रकरणाबाबत अजूनही निर्णय घेता न आलेल्या आयोगाने 'कट ऑफ डेट' पूर्वीची हजारो प्रकरणे ट्रंका भरभरून मागवून घेतल्याने सर्वोच्च व उच्च न्यायालयांच्या निर्णयाची पायमल्ली झालेली आहे.**

२४. ८ सप्टेंबर १९९४ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास पायदळी तुडविण्याच्या पापात आयोग थेट सहभागी असल्याच्या तीन पुराव्यापैकी पहिल्या पुराव्याचे तपशील मी येथे पूर्ण करतो. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की 'कट ऑफ डेट' नंतरची प्रकरणे तपासण्याचे काम विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सोपविणारा मा. उच्च न्यायालयाचा निर्णय त्यावेळी झालेला नव्हता. २० फेब्रुवारी २००२ व १४ एप्रिल २००२ या तारखांना अनुक्रमे औरंगाबाद व मुंबई खंडपीठाचे हे निर्णय झालेले आहेत. सभागृहातील तारांकित प्रश्नाचे उत्तर ११ डिसेंबर २००२ रोजीचे आहे व लक्षवेधी सूचनेवरील चर्चा ३ ऑगस्ट २००१ रोजीची आहे. या चर्चेनंतरच "काही व्यथा शिल्लक राहिल्या तरी **सेवा नियमित करण्यात आल्याचे समाधान**" **'कट ऑफ डेट' पूर्वीच्या शिक्षकांना देणारा शासननिर्णय १८ ऑक्टोबर २००१ या दिवशी निर्गमित झाला.** 'कट ऑफ डेट' पूर्वीचे एक एक प्रकरण आपल्याकडे मागविण्याचा त्या काळात आयोगाने प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. तसा प्रयत्न करण्याचा प्रश्नही नव्हता. कोणाच्या स्वप्नातही ही

***सहपत्र : पाच***

*तात्काळ : समय मर्यादित*

***क्रं./उशिसं/एनजीसी/२००४/३२११/नेटसेट/मवि-१***

**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), : महाराष्ट्र राज्य, पुणे-१ : दिनांक :-१.११.२००४**

**प्रति,**

१) कुलसचिव, सर्व विद्यापीठे

२) सर्व विभागीय सहसंचालक, महाराष्ट्र राज्य

**विषय :-** नेट/सेट परीक्षा शिथील करणे/सूट देणेबाबत.मुंबई विद्यापीठ येथे दिनांक २६.१०.२००४ रोजी झालेली बैठक

**संदर्भ :-** उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक युएसजी २००३/(५०)/विशि-४, दिनांक २८ ऑक्टोबर २००४

उपरोक्त विषयाबाबत या संचालनालयाचे पत्र क्रं. उशिसं/एनजीसी/२००४/३२११८/नेटसेट/मवि-१, दि. २८.१०.२००४ रोजी आपणांस कळविण्यात आले होते.

परंतू, उपरोक्त विषयाबाबत संदर्भात नमूद केलेल्या शासन पत्राअन्वये परिच्छेद नं. २ मध्ये खालीलप्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत. (सुलभ संदर्भाकरिता संदर्भात नमूद केलेले दि. २८ ऑक्टोबर २००४ चे शासन पत्र सहपत्रित करित आहे)

या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सर्व विद्यापीठांनी त्यांच्या अंतर्गत असलेली नेट/सेट परीक्षेतून सूट देण्याची प्रकरणे शासनास दिनांक २७.११.२००४ पर्यंत सादर करावयाची आहेत. तसेच शासकीय महाविद्यालयांची प्रकरणे संबंधित सहसंचालकांनी विद्यापीठामार्फत शासनास सादर करावयाची आहेत. शासनाकडे ही प्रकरणे प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या Exemption Committee बरोबर विद्यापीठ निहाय बैठका आयोजित केल्या जाणार आहेत. तरी, विनंती करण्यात येते की, **सर्व विद्यापीठांनी व सहसंचालकांनी नेट/सेट परीक्षेतून सूट देण्याची सर्व प्रकरणे दिनांक २७.११.२००४ पर्यंत शासनास सादर करावीत. ही माहिती सादर करतांना कोणतेही प्रकरण शिल्लक राहणार नाही याची दक्षता घ्यावी.** दिनांक २७.११.२००४ नंतर आलेली कोणतेही माहिती ग्राह्य धरली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

तेव्हा संदर्भात नमूद केलेल्या शासनपत्रानुसार आपल्या स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

**शिक्षण संचालक,**
(उच्च शिक्षण)

कल्पना त्यावेळी आली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाची या सर्व बाबीकडे पहाण्याची वृत्ती कशी होती एवढे समजण्यापुरताच पहिल्या पुराव्याचा उपयोग करुन घ्यावा लागेल.

२५. औरंगाबाद व मुंबई खंडपीठाच्या निर्णयानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अंगात फुरसे भरल्यासारखी आयोगाची स्थिती झाली. 'कट ऑफ डेट' पूर्वीचे, नंतरचे, असा भेदभाव न ठेवता कोणाकोणाचे प्रकरण तपासायचे? यासाठी एक वातावरण महाराष्ट्रभर तयार करण्यासाठी आयोगाने सन २००२ या वर्षभर मोहीम राबविलेली दिसून येते. सर्व विद्यापीठे व शासनाला पाठविलेल्या पत्रव्यवहारातून हे वातावरण तयार केले जात होते. या तारखेपासून त्या तारखेपर्यंतच्या प्रकरणी निर्णय घेण्याचा मा. औरंगाबाद पिठाचा निर्णय असतांना व मुंबई खंडपीठाने निर्णयार्थ १०४ प्रकरणाचे परिशिष्टच सोबत जोडले असतांना "मागचे पुढचे सारे जग" तपासण्याची मोहीम आयोगाने हाती घेतली. हे वातावरण लक्षात येताच **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ३० मार्च २००३ रोजी एक तपशीलवार मेमोरंडम पाठवून हे सारे तपशील आयोगाच्या लक्षात आणून दिले. या मेमोरंडम सोबत अनेक सहपत्रे जोडलेली होती. आमचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आम्हाला वेळ देण्यात यावी अशी आयोगाला विनंती करण्यात आली होती.**

२६. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे म्हणणे आपण ऐकून घ्यावे अशी विनंती करणारी स्मरणपत्रे महासंघातर्फे वारंवार पाठविण्यात आली. तेव्हा कोठे दोन वर्षांनी एका स्मरणपत्राला २३ मार्च २००५ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून उत्तर आले. काय उत्तर आले? तर "**तुमच्या स्मरणपत्रासोबत सहपत्रे नाहीत, ती पाठवा.**" प्रत्येक स्मरणपत्रासोबत सहपत्रे पाठवावयाची नसतात पण ज्या ३० मार्च २००३ च्या मूळ मेमोरंडमचे स्मरण वारंवार देण्यात येत होते, त्यासोबत सर्व सहपत्रे पाठविली होती. याचा अर्थ मूळ मेमोरंडम त्या कार्यालयात दिसत नव्हता असा आहे. संघटनेतर्फे पुन्हा सर्व सहपत्रे पाठविण्यात आली. **मेमोरंडमचा व सहपत्राचा विचार होणे दूरच राहिले, म्हणणे ऐकून घेणे दूरच राहिले, पण दोन वर्षानंतर 'ती सहपत्रे दिसतच नाहीत' असे लज्जास्पद पत्र पाठविणाऱ्या आयोगाचा कारभार किती गलथान आहे हे लक्षात यायला वेळ लागत नाही. सर्वोच्च न्यायालयाचा अनुकूल निर्णय असतांनासुद्धा १० हजार शिक्षकांना अस्वस्थ करुन सोडणाऱ्या प्रश्नाकडे पाहण्याची शिर्षस्थ संस्था या नात्याने आयोगाची ही वृत्ती लज्जास्पद आहे असेच कोणीही म्हणेल.**

२७. 'कट ऑफ डेट' पूर्वीची प्रकरणे पाठवा असे तारीख टाकून लिहिल्याने सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होतो हे आयोगाला ठाऊक होते त्यामुळेच अमुक एका तारखेपासूनची किंवा त्या तारखेनंतरची प्रकरणे पाठवा असे आयोगाने आपल्या पत्रव्यवहारात कोठेही म्हटलेले नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाची याबाबतीतील ही हुशारी मान्य केलीच पाहिजे, ती अशी की विद्यापीठाकडे किंवा शासनाकडे पाठविलेल्या कोणत्याही पत्रव्यवहारामध्ये कोणत्या तारखेनंतरची प्रकरणे पाठवावयाची आहेत याचा उल्लेख विद्यापीठ अनुदान आयोगाने कटाक्षाने टाळला आहे. 'कट ऑफ डेट' पूर्वीची प्रकरणे विचारार्थ घेण्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होतो याची हमखास जाणीव असल्यामुळेच तारखेचा उल्लेख विद्यापीठ अनुदान आयोगाने टाळलेला आहे. "**तुम्हाला जी प्रकरणे पाठवावयाची असतील ती पाठवा पण प्रत्येक प्रकरण स्वतंत्रपणे पाठवा.**" असे साचेबंद वाक्य विद्यापीठ अनुदान आयोगाने या सर्व पत्रव्यवहारात वापरलेले दिसते. पण दिल्लीत व मुंबईत झालेल्या बैठकीमध्ये मात्र १९९१ ते १९९९ च्या काळातील सर्व प्रकरणे पाठविण्याचे मुबलक तोंडी इशारे त्यांनी दिले.

२८. महाराष्ट्रातील विद्यापीठांना, महाराष्ट्र शासनातील अधिकाऱ्यांना आयोगाचा पत्रव्यवहार वाचता येत नाही, माहिती कशी भरून पाठवावी हे कळत नाही हे विद्यापीठ अनुदान आयोगाला २-३ वर्षे कळलेच नाही. जेव्हा कळले तेव्हा त्यांनी युजीसीचे तीन अंतराळवीर विमानाने मुंबईला पाठविले. त्यांनी मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात महाराष्ट्र शासनाचे अधिकारी, उच्च शिक्षण संचालक, त्यांचे सारे सहसंचालक, विद्यापीठांचे कुलसचिव, व इतर अधिकारी यांच्या बैठकीला मार्गदर्शन केले. त्यांनी लेखी काहीच दिले नाही. या बैठकीचे कार्यवृत्त मंत्रालयातील उपसचिवांनी तयार केले असून त्यांच्या स्वाक्षरीने " MINUTES of the meeting regarding relaxation from the NET/SET Examination from the University Grants Commission held on 26th October 2004 at 11.00 a.m. in the Management Council Hall of Mumbai University, Mumbai." या मथळ्याने ते तयार करण्यात आलेले आहे. **(सहपत्र दोन)** विद्यापीठ अनुदान आयोगातून कोण कोण अंतराळवीर आले होते व त्यांनी सभेत काय म्हटले याचा या कार्यवृत्तातील उल्लेख पुढील प्रमाणे :-

"All the Universities in the State have submitted their proposals in the prescribed format for seeking relaxation/exemption from the Net/Set Examination to the University Grants Commission. **However, the information given by the Universities in the prescribed format was not proper,** therefore, U.G.C. has requested this Department to hold the meeting with the Registrars of the Universities and the Joint Directors of Higher Education. Accordingly, this meeting was held on 26th October, 2004, the following officers from the U.G.C were present.

1. Shri Ashok Kumar Dogra. - Joint Secretary, University Grants Commission.

2. Ms. Shashi Munjal - Under Secretary, University Grants Commission

3. Ms. Rita Goyal - Under Secretary University Grants Commission"

२९. बाकी सर्व गोष्टी सर्वांना समजत होत्या. पण मा. 'सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करण्याचे पुण्य' कोणी पदरी बांधून घ्यायचे? एवढाच प्रश्न शिल्लक होता. १९९१ च्या पुढची सर्व बिगर नेटसेट धारकांची प्रकरणे पाठवायची किंवा नाही यावर चर्चा झाली. विद्यापीठ अनुदान आयोगाचे तारखेबाबतचे कोणतेही लेखी आदेश नसतांना "सहसचिव श्री. डोग्रासाहेब" या अंतराळवीराने All the cases असा शब्द या बैठकीत वापरला. नरो वा कुंजरोवा या धर्तीवर तोंडी बोलतांना त्यांनी "हो! हो! १९ सप्टेंबर १९९१ च्या नंतरची प्रकरणे सुद्धा" असेही सभेला सांगितले. तयार केलेल्या अधिकृत कार्यवृत्तामध्ये मंत्रालयातील उपसचिवांनी तारखेचा उल्लेख युजीसीच्या अंतराळवीराच्या नावे नोंदविला तो पुढील शब्दात :-

"The list of the other members who were present in the meeting is enclosed herewith. At the beginning of the meeting all the members have introduced themselves. **First of all Shri Dogra has clarified** that Lecturers who have submitted thesis for Ph.D. before 31st December 2002 or who have awarded degree of Ph.D. upto that date are exempted from the Net/Set Examination **and the lecturers who were appointed after 19th September 1991, are required to pass Net/Set**

**"सभापती महोदय, मी आपल्याला सुरुवातीलाच सांगितले की, या संदर्भातील अनेक लिगल पॉईन्टस् उपस्थित होतात. युनिव्हर्सिटी ग्रॅन्ट कमिशनकडून जो खुलासा आलेला आहे, त्यामध्ये हे मॅन्डेटरी आहे, असे म्हटलेले आहे. तरीसुध्दा यामध्ये अधिक माहिती घेण्यासाठी या संदर्भाने लिगल ओपिनियन मागविलेले आहे. म्हणून मला असे सांगावयाचे आहे की, या संदर्भातील जो काही निर्णय असेल तो निर्णय पॉझिटिव्हदृष्ट्या १५ दिवसामध्ये घेतला जाईल." - मा. उच्च शिक्षण मंत्री**

*(परिच्छेद १४ पहा)*

***मेमोरंडमचा व सहपत्राचा विचार होणे दूरच राहिले, म्हणणे ऐकून घेणे दूरच राहिले, पण दोन वर्षानंतर 'ती सहपत्रे दिसतच नाहीत' असे लज्जास्पद पत्र पाठविणाऱ्या आयोगाचा कारभार किती गलथान आहे हे लक्षात यायला वेळ लागत नाही. सर्वोच्च न्यायालयाचा अनुकूल निर्णय असतांनासुद्धा १० हजार शिक्षकांना अस्वस्थ करुन सोडणाऱ्या प्रश्नाकडे पाहण्याची शिर्षस्थ संस्था या नात्याने आयोगाची ही वृत्ती लज्जास्पद आहे, असेच कोणीही म्हणेल.***

*(परिच्छेद २६ पहा)*

**Examination** There is an Exemption Committee in the University Grants Commission who decides all the cases of the Net/Set Examination."

३०. हुशार अधिकारी फक्त विद्यापीठ अनुदान आयोगातच असतात हा भ्रम दूर करण्यासाठी मंत्रालयातील उपसचिवांनी २६.१०.२००४ च्या बैठकीचे कार्यवृत्त तयार करतांना **"१९ सप्टेबर १९९१ नंतरची सर्व प्रकरणे" हा उल्लेख अंतराळविरांच्या तोंडी घातला.** त्याप्रमाणे कार्यवृत्त तयार केले. मात्र स्वतःच्या स्वाक्षरीने त्यांनी २८ ऑक्टोबर २००४ रोजी जे आदेश **(सहपत्र चार)** काढले त्यात मात्र उपसचिवांनी तसा उल्लेख येऊ दिला नाही. "सर्व प्रकरणे" असाच शब्द प्रयोग आपल्या आदेशात ठेवला. तो पुढील शब्दात :-

"तरी विनंती करण्यात येते की, सर्व विद्यापीठांनी व सहसंचालकांनी **नेट/सेट परीक्षेतून सूट देण्याची सर्व प्रकरणे** दिनांक २७-११-२००४ पर्यंत शासनास सादर करावीत."

स्वतःच्या सहीने काढलेल्या आदेशात उपसचिवांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लेखी आदेशातील शब्दरचना नमूद केली होती, तर स्वतःच्या सहीने तयार केलेल्या कार्यवृत्तात मात्र अंतराळवीरांनी दिलेले तोंडी आदेश नमूद करुन त्यांना अडकवून ठेवले होते. **"१९ सप्टेबर १९९१ नंतरची सर्व प्रकरणे" व "सर्व प्रकरणे" या दोन शब्दरचनेमधील फरक उपसचिवांना चांगला कळत होता,** हे विद्यापीठ अनुदान आयोगाला जितक्या लवकर कळेल तितकी त्यांची कमी फजिती होईल. सर्वोच्च न्यायालयाचे अवमान पुण्य पदरी बांधण्यास हा फरक कारणीभूत होऊ शकतो, हे कळण्यासाठी सुद्धा बुद्धिमत्तेचीच आवश्यकता असते. शिवाय आपणच हुशार आहोत व मंत्रालयातील अधिकाऱ्यांना काही कळत नाही, हा अंतराळविरांचा अहंभाव दूर होण्यास मदत होईल ही उपसचिवांची भावना, तशी असल्यास, योग्यच आहे असे म्हणावे लागेल. हे अंतराळविर एस.एन.डी.टी. विद्यापीठात गेले तेंव्हा त्यांचे स्वागत तर सोडा, त्यांना कुणी या! बसा! सुद्धा म्हटले नाही. थोडेसे 'महाराष्ट्र दर्शन' या अंतराळविरांना घडविल्याबद्दल सर्वांनी त्या विद्यापीठाचे आभार मानले पाहिजेत.

३१. २६ ऑक्टोबर २००४ रोजीची अंतराळवीरांची बैठक आटोपली. त्या बैठकीचे कार्यवृत्त तयार करतांना त्यांचे शब्द त्यांच्या गळ्यात अडकवितांना २८.१०.२००४ रोजीचा आदेश निर्गमित करतांना उपसचिवांनी वापरलेली शब्दरचना मात्र पूर्णपणे कायदेशीर होती. त्याच्या उलट ही बैठक आटोपून पुण्याला गेलेल्या उच्च शिक्षण संचालकांनी त्याच तारखेला (२८.१०.२००४) निर्गमित केलेल्या आदेशातील शब्दरचना 'बारा प्यायलेल्या वासरा'सारखी दिसून येते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पूण्यप्रतापाचा तिसरा पुरावा म्हणून हे आदेश **सहपत्र तीन** म्हणून सोबत दिलेले आहेत. या आदेशातील पुढील मजकूर जरा काळजीपूर्वक वाचा :-

" दिनांक २६/१०/२००४ रोजी सकाळी ११.०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृह, मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे सर्व विद्यापीठांचे कुलसचिव व सर्व विभागीय सहसंचालक यांची समन्वय सभा झाली. या सभेत **विद्यापीठ अनुदान आयोगाचे अधिकारी श्री डोग्रा साहेब यांनी उपरोक्त विषयाबाबत सर्व प्रचलीत नियमानुसार सविस्तर व सुस्पष्ट मार्गदर्शन केले. दिनांक १९.९.९१ नंतर अधिव्याख्याता म्हणुन सेवेत रुजु झालेल्या व नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या सर्व अधिव्याख्यात्यांच्या व्यक्तीगत प्रकरणीका नेट/सेट परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याकरिता विहीत नमुण्यात तयार करावयाच्या आहेत.** त्याबाबतचा विहीत नमुना सदर सभेत सर्व संबंधीतांना वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच, हे काम प्रत्येक विद्यापीठाने एक महिन्याच्या आत म्हणजे दि. २७.११.२००४ पूर्वी पूर्ण करावयाचे आहे उपरोक्त विषयाबाबतची ही शेवटची संधी आहे."

३२. "आम्हा महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांना यातले काही कळत नव्हते" ही गोष्ट उच्च शिक्षण संचालकांनी या पत्रात सरळ सरळ कबूलच केली आहे. "विद्यापीठ अनुदान आयोगाचे अधिकारी श्री डोग्रा साहेब यांनी उपरोक्त विषयाबाबत सर्व प्रचलीत नियमानुसार सविस्तर व सुस्पष्ट मार्गदर्शन केले." या वाक्यातून मला तरी दुसरा काहीच अर्थ कळत नाही. शिवाय त्यांच्या आदेशातील ही शब्दरचना मोघम व पोकळ आहे. एका काळांत "कायद्यातील 'या' कलमातील 'या' परिच्छेदाच्या 'या' उपपरिच्छेदान्वये मला दिलेल्या अधिकाराचा वापर करुन मी पुढील आदेश काढत आहे." अशी आदेशाची सुरुवातच असायची. हळूहळू ती पद्धत बंद झाली. कारण त्यासाठी कायदा, कलम, परिच्छेद, उपपरिच्छेद बारकाईने वाचावा लागतो. **"विद्यापीठ अनुदान आयोगाचे अधिकारी श्री. डोग्रा साहेब यांनी उपरोक्त विषयाबाबत सर्व प्रचलीत नियमानुसार सविस्तर व सुस्पष्ट मार्गदर्शन केले."** अशी मोघम शब्द रचना आदेश काढतांना वापरली म्हणजे काहीच पहावे लागत नाही. **"१९९१ नंतरची प्रकरणे प्रचलीत नियमानुसार पाठवावयाची आहेत"** असे लिहिले की तो नियम कोणता हे दाखविण्याची जबाबदारी आपल्यावर येत नाही. ज्याचे त्यांनी पहात बसावे, अशी भूमिका घेता येते.

३३. **"सविस्तर व सुस्पष्ट मार्गदर्शन केले"** असे जे प्रमाणपत्र उच्च शिक्षण संचालकांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अंतराळवीरांना दिले, त्याचे सुद्धा करावे तेवढे कौतुक थोडेच आहे. नियम काटेकोर नसतात तेव्हा सविस्तर मार्गदर्शन, व लेखी आदेश अस्पष्ट असतात तेंव्हा सुस्पष्ट मार्गदर्शन करण्याची पाळी शिर्षस्थ संस्थांवर येते. एवढ्या मोठ्या भारताचा कारभार चालवितांना अंतराळवीर पाठवून सविस्तर व सुस्पष्ट मार्गदर्शन करण्याची "स्पॉट डिलिव्हरी" देण्याचे धोरण विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वीकारले असेल तर त्याबद्दल त्यांना द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच आहेत. **"त्याबाबतचा नमुना सभेत वितरित करण्यात आल्याचा उल्लेख"** नमुनेदारच म्हणावा लागेल. नमूना वितरित करण्यासाठी जर अशा बैठका होत असतील तर

**"सभापती महोदय, याचा अर्थ असा आहे की, सुप्रिम कोर्टाने जजमेंट दिलेले आहे. यु.जी.सी.ने नेट-सेटची पात्रता लागू केलेली आहे ती लागू करीत असताना हा ऑप्शन दिलेला आहे. १९९१ मध्ये वेगळा ऑप्शन दिला होता आणि आता वेगळा ऑप्शन दिला आहे. आमचे अनुदान हवे असेल तर हे लागू करा. नको असेल तर लागू करण्याची आवश्यकता नाही असे स्वातंत्र्य युनिव्हर्सिटीला दिले आहे."**

**- मा. उच्च शिक्षण मंत्री**

(परिच्छेद २१ पहा)

***"नेटसेटची परीक्षा उमेदवारांसाठी सक्तीची करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या रेग्युलेशनबाबत एका प्रकरणात (सिव्हील अपील नं.१८१९/१९९४ ए.आय.आर. सुप्रिम कोर्ट ३३६) सर्वोच्च न्यायालयाने या रेग्युलेशनची तपशीलवार चिकित्सा करणारा अंतिम निर्णय दिला व विद्यापीठ अनुदान आयोगाचे हे रेग्युलेशन शिफारशीच्या (रेक्मेंडटरी) स्वरुपाचे असून त्या शिफारसी राज्य शासनाने किंवा विद्यापीठाने सक्तीच्या केल्यास पुढील काळात सेवेत येणाऱ्या अर्जदारांना लागू राहतील (प्रॉस्पेक्टीव्ह) असा स्पष्ट निवाडा सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेला आहे, हे खरे आहे काय" या प्रश्न भाग १ ला मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी एका शब्दात 'होय.' असे उत्तर दिलेले आहे.***

*(परिच्छेद ११ पहा)*

विद्यापीठ अनुदान आयोगाचा सुवर्णपदक देऊन गौरव करण्याचीच ती गोष्ट होईल.

३४. "हे काम प्रत्येक विद्यापीठाने एक महिन्याच्या आत म्हणजे दि. २७.११.२००४ पूर्वी पूर्ण करावयाचे आहे. **उपरोक्त विषयाबाबतची ही शेवटची संधी आहे.**" अशा प्रकारचा एक उल्लेख उच्च शिक्षण संचालकांच्या पत्रामध्ये आहे. 'संधी' या शब्दाचा एक निश्चित अर्थ आहे. जुन्या काळी संगीत नाटक मंडळ्यांचा मुक्काम आटोपत आला म्हणजे चांगल्या संगीत नाटकाचा शेवटचा खेळ केला जात असे. उद्या कोणाला हळहळ वाटू नये म्हणून 'शेवटची संधी' अशी जाहिरात केली जात असे. चांगल्या चित्रपटाला सुद्धा ही गोष्ट लागू असे, संधी ही आल्हाददायक, कल्याणकारक, आनंदसूचक असते. भयसूचकतेचा अभाव त्यात अभिप्रेत असतो. त्यामुळे अशी संधी वारंवार टिपण्याची सवय असलेल्या माणसाला उपरोधाने 'संधीसाधू' म्हणण्याची प्रथासुद्धा पडली. **पुन्हा पुन्हा विचार करूनसुद्धा ही कशाची "शेवटची संधी" आहे** हे मला तरी कळलेले नाही. खूप शोधून सुद्धा "सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा पायदळी तुडवून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या उंबरठ्यावर मान कापून घेण्याची ही शेवटचीच संधी आहे यानंतर अशी संधी उपलब्ध होणार नाही" यापेक्षा वेगळा अर्थ मला तरी या शब्दरचनेत दिसत नाही. दहा हजार शिक्षकांच्या माना कापण्याचा प्रकल्प विद्यापीठ अनुदान आयोगाने हाती घेतला असतांना आयोगाला मदत करण्याचा कोणत्याही अधिकाऱ्याचा अधिकार त्याला नाकारण्याचा आम्हाला काही अधिकार नाही. पण बेकायदेशिरपणे अशी कापाकापी होत असतांना होणारी तडफड व त्यातून उसळणाऱ्या असंतोषाच्या ज्वाला डोळे भरून पहाण्याचे कर्तव्य आयोगाला व त्यांच्या मदतनीसांना पार पाडावेच लागेल.

३५. दिनांक २८ ऑक्टोबर २००४ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी निर्गमित केलेल्या आदेशात "**दिनांक १९.९.९१ नंतर अधिव्याख्याता म्हणून सेवेत रुजू झालेल्या व नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या सर्व अधिव्याख्यात्यांच्या व्यक्तिगत प्रकरणीका** नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याकरिता विहित नमुन्यात तयार करावयाच्या आहेत" अशी वाक्यरचना ठेवली होती तर शासनाच्या वतीने सहसचिवांनी त्याच दिवशी काढलेल्या आदेशात मात्र "तरी विनंती करण्यात येते की, सर्व विद्यापीठांनी व सहसंचालकांनी **नेट/सेट परीक्षेतून सूट देण्याची सर्व प्रकरणे** दिनांक २७-११-२००४ पर्यंत शासनास सादर करावीत." अशी शब्दयोजना होती. दोघांनीहि आदेश विद्यापीठांना व सहसंचालकांना दिले होते. अधिकारपद परंपरेच्या उतरंडीतील वरचे दोन अधिकारी परस्परविरोधी (एक सर्वोच्च न्यायालयाचा मान ठेवणारा व दुसरा अवमान करणारा) आदेश देतात, तेंव्हा खालच्या पातळीवर नुसता गोंधळ होतो. दुसरे काहीच होत नाही. वरिष्ठांचे आदेश हे वरिष्ठच असतात. शासनाचा आदेश पाहिल्यावर उच्च शिक्षण संचालक अस्वस्थ झाले. त्यातच तुम्ही तुमच्या आदेशात १९.९.९१ ही तारीख टाकल्याने सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होतो असे त्यांना कुणीतरी सांगितल्यामुळे ते जास्तच अस्वस्थ झाले. त्या अस्वस्थतेवर उपाय म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर २००४ रोजी दुसरा आदेश काढला. **(सहपत्र पाच)** व त्यात शासनाचे पत्र जसेच्या तसे उधृत केले व स्वतःचे फक्त एक वाक्य टाकले ते असे की "तेव्हा संदर्भात नमूद केलेल्या शासनपत्रानुसार आपल्या स्तरावर कार्यवाही करण्यात यावी." शिवाय आपल्या पहिल्या आदेशातील "दिनांक १९.९.९१ नंतर अधिव्याख्याता म्हणून सेवेत रुजु झालेल्या व नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या सर्व अधिव्याख्यात्यांच्या व्यक्तिगत प्रकरणिका नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याकरिता विहित नमुन्यात तयार करावयाच्या आहेत." **हा मजकूर उच्च शिक्षण संचालकांनी आता गाळून टाकला. म्हणजे तो दुसऱ्या आदेशात येवू दिला नाही. कारण या वेळेपर्यंत त्यांना "मा. डोग्रासाहेबांचे सविस्तर व सुस्पष्ट मार्गदर्शन" काही खरे नाही हे कळून चुकले होते.**

३६. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 'पूण्यप्रभावा'तील सहभाग स्पष्ट करणाऱ्या तीनही पुराव्यांची माहिती वर तपशीलवारपणे दिलेली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या या बेजबाबदार वर्तनामुळे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रात कमालीचा असंतोष निर्माण होणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने हाती घेतलेला आंदोलनाचा कार्यक्रम या असंतोषाचे प्रतिनिधीत्व करणाराच आहे.

३७. दिनांक ११ सप्टेबर २००५ रोजीच्या महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत १२ परिच्छेदाचा एक आंदोलन ठराव महासंघाने पारीत केला असून त्यातील ११ व्या परिच्छेदामध्ये आंदोलनाचे तपशील नमूद आहेत. ते पुढील प्रमाणे :-

"विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विधिसल्लागारांच्या सल्ल्यानंतरही विद्यापीठ अनुदान आयोगाने आपले वर्तन दुरुस्त केलेले नसल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निषेधार्थ पुढील आंदोलनात्मक कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे. :-

**(१) महासंघाच्या नेतृत्त्वाखाली शनिवार, दिनांक १ ऑक्टोबर २००५ रोजी दुपारी १ वाजता पुणे येथील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहसचिवांच्या कार्यालयावर राज्यस्तरीय मोर्चाचे आयोजन केले जाईल. पुणे विद्यापीठाच्या मुख्यगेटवरून हा मोर्चा दुपारी १ वाजता निघेल. "महाराष्ट्रातील याबाबतच्या स्थितीकडे विद्यापीठ अनुदान आयोगाने डोळे उघडून पहावे असे आयोगाला कळवा" अशी सहसचिवांना विनंती केली जाईल.**

**(२) शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर २००५ रोजी दुपारी ४.०० वाजता सर्व विद्यापीठांच्या मुख्यालयावर विद्यापीठस्तरीय मोर्चाचे आयोजन**

**आपल्या कोणत्याही पत्रव्यवहारामध्ये आयोगाने तारखेचा उल्लेख केलेला नाही ही गोष्ट खरी आहे. पण त्यामुळे या अपकृत्यातील विद्यापीठ अनुदान आयोगाचा सहभाग आयोगाला लपवून ठेवता आला नाही. अशी लपवा छपवी करण्यामध्ये आयोगाला संपूर्णपणे अपयश आलेले आहे.**

*(परिच्छेद ९ पहा)*

# सोमवार, दिनांक ५ डिसेंबर २००५

## रोजी १२ ते ५ दरम्यान

### पुणे येथील विद्यापीठ अनुदान आयोग सहसचिवांच्या कार्यालयासमोर

# धरणे आंदोलन

*''विद्यापीठ अनुदान आयोगात चाललेली एवढी मोठी भंपकगिरी लक्षात आणून देण्यात हे कार्यालय अपयशी झाले असेल तर सहसचिवांचे हे कार्यालय बंद करा'' अशी मागणी केली जाईल.*

**करुन 'वस्तुस्थिती' विद्यापीठ अनुदान आयोगाला कळविण्यात यावी अशी मा. कुलगुरुंना विनंती करण्यात येईल.**

**(३) सोमवार, दिनांक ५ डिसेंबर २००५ रोजी १२ ते ५ दरम्यान पुणे येथील विद्यापीठ अनुदान आयोग सहसचिवांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन आयोजित केले जाईल. "विद्यापीठ अनुदान आयोगात चाललेली एवढी मोठी भंपकगिरी लक्षात आणून देण्यात हे कार्यालय अपयशी झाले असेल तर सहसचिवांचे हे कार्यालय बंद करा" अशी मागणी केली जाईल.**

**(४) सप्टेंबर व ऑक्टोबर २००५ या दोन महिन्याच्या काळात जिल्हास्तरीय मेळावे आयोजित करुन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या बिनडोक निर्णयाची तपशीलवार माहिती लोकांपर्यंत पोचविण्याचे काम पार पाडले जाईल.**

(५) यानंतरही विद्यापीठ अनुदान आयोगाने मा. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निर्णया विरोधातील आपले वर्तन चालूच ठेवल्यास डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक होवून आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेतला जाईल.

३८. महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात एवढी अस्वस्थता निर्माण झालेली असतांना आम्ही लोकप्रतिनिधी याकडे डोळेझाक करू शकत नाही. लोकप्रतिनिधींच्या बैठकीमध्ये या सर्व बाबींचा विचार करण्यात आला, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वृत्तीबद्दल तीव्र असंतोष व्यक्त करण्यात आला, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या आंदोलनाला ठामपणे पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला, अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ या संघटनांची आयोगाला माहिती करुन देण्याची आवश्यकता आहे, अशी भावना व्यक्त झाली. मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय यासारख्या विधिमय संस्थाबाबत आयोगाकडून व्यक्त होत असलेल्या अनादराबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यात आले, चार महिन्यात निर्णय घेण्याला मा. उच्च न्यायालयाने सांगितले असतांना चार वर्षात निर्णय होत नाही व एखाद्या राज्यव्यापी संघटनेचे म्हणणे ऐकून घेण्याला आयोगाला वर्षानुवर्षे वेळ मिळत नाही, याबद्दल तीव्र खेद व्यक्त करण्यात आला.

३९. वेगवेगळ्या क्षेत्रात देशपातळीवर काम करणाऱ्या शिर्षस्थ संस्थांनी जबाबदारपणे व मातब्बरीने वागले पाहिजे. लोकांनी सुद्धा अशा शिर्षस्थ संस्थांसमोर आदरपूर्वक सादर झाले पाहिजे पण;

(१) १० हजार शिक्षकांची कत्तल करण्याचे कृत्य उरकण्यापूर्वी निदान संघटनेचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुद्धा आयोगाजवळ वेळ नसेल;

(२) चार महिन्यात निर्णय करा असा मा. उच्च न्यायालयाने आदेश दिलेला असतांना असा निर्णय करण्यासाठी आयोगाला चार वर्षे झाले तरी वेळ मिळत नसेल;

(३) सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या १९९१ च्या रेग्युलेशनबाबत दिलेला विश्लेषणात्मक निवाडा पहाण्यासाठीसुद्धा त्यांना वेळ नसेल;

(४) नेटसेट पात्रतेबाबतचे १९९१ चे आपले रेग्युलेशन आपणच रद्द केले आहे हे जर त्यांना ठाऊक नसेल;

(५) ४ एप्रिल २००० च्या रेग्युलेशनमध्ये "यापूर्वी विधिवत निवड समितीमार्फत विधिवतरित्या निवड झालेल्या व तत्कालीन किमान पात्रता धारकांना नेटसेट पात्रता लागू रहाणार नाही" असा आपणच कायदा केलेला आहे याची त्यांना आठवण रहात नसेल;

(६) "सेवेतील शिक्षकांने नेटसेटची पात्रता परीक्षा उत्तीर्ण केली नसेल तर त्याला वरिष्ठ व निवडश्रेणी दिली जाणार नाही" ही २४ डिसेंबर १९९८ च्या नोटीफिकेशमधील तरतूद ४ एप्रिल २००० ला दुसरे नोटीफिकेशन काढून आपल्याला रद्द करावी लागली होती हे सुद्धा त्यांना आठवत नसेल;

(७) महाराष्ट्रात कायद्याने पात्रता कशी ठरते? ते ठरविण्याचा कुणाला अधिकार आहे? त्यावर आधारित कायदेशीर 'कट ऑफ डेट' कोणती आहे? याविषयी आयोग संपूर्णपणे अज्ञानी असेल;

(८) मा. मुंबई उच्च न्यायालयाने कोणती प्रकरणे छाननीसाठी घ्यायला सांगितली आहेत याचा अभ्यास न करता 'मागचे पुढचे सारे जग' छाननीसाठी घेण्याचा निर्धार आयोगाने केला असेल;

(९) मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणेच कारवाई करा असा आयोगाच्या विधी सल्लागारांनी बिनचूक सल्ला दिल्यानंतरही आयोगाचा उपरोक्त निर्धार कायमच रहाणार असेल;

(१०) स्पष्ट, काटेकोर व बिनचूक भूमिका घेण्याऐवजी मोघम, पोकळ व बिनबुडाची भूमिका घेण्यात त्यांना धन्यता वाटत असेल;

(११) अंतराळवीरांना उतरवून तोंडी "सर्व प्रचलित नियमानुसार सविस्तर व सुस्पष्ट मार्गदर्शन" करुन देशाचा कारभार करण्याचे धोरण त्यांनी ठरविले असेल;

तर त्यांची ही कृत्ये लोकांच्या तीव्र अनादाराचा व तिरस्काराचा विषय होतात हे जितक्या लवकर आयोगाच्या लक्षात येईल तेवढे ते आयोगाच्या हिताचे आहे.

*दिनांक :*
*०१.१०.२००५*

**- प्रा.बी.टी.देशमुख,**
*विधानपरिषद सदस्य*

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh, Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO.** MAHBIL/2001/4448 Licenced to post without prepayment **LICENCE NO. NR/ATI/78/2002** Name of the Posting office : **R.M.S. Amravati.**
Date of Posting : **28.09.2005**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

--------------------------------------------------

To,..........................................................

..............................................................

..............................................................

..............................................................

..............................................................